जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १७ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत सानेगुरुजी संस्कार केंद्र व ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने आयोजित वाचन प्रेरणा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.बा. मोकाशी लिखीत " पालखी" या कादंबरीच्या अभिवाचनातून वारीबद्दलच्या मराठी माणसांच्या भावना परिवर्तनच्या कलावंतनांनी प्रभावीपणे मांडल्या.

दि. १७ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सोमवारी परिवर्तन या नाटय संस्थेच्या कलावंतांनी पालखी या कादंबरीचे अभिवाचन केले. या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी सिनेट सदस्य विष्णू भंगाळे, गोपालभाई चुधरा, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे, गणपत माळी, राहुल निंबाळकर आदी यांची उपस्थिती होती. सामिया पठाण या विद्यार्थिनीने सूत्रसंचालन केले. तुकोबारायांच्या अभंगाने महोत्सवाला प्रारंभ झाला. वारीतील अनुभव, गमती जमती याचा अनुभव उपस्थित रसिकांना घेता आला. या सोबतच पंढरपूरच्या वारी विषयी मराठी माणसांच्या मनातील आस्था प्रभावीपणे कलावंतांनी पोहचविल्या. पालखीचे नाट्यरुपांतर शंभू पाटील यांनी केले असून दिग्दर्शन मंजुषा भिडे यांनी केले आहे. हर्षल पाटील, मंजुषा भिडे, होरीलसिंग राजपूत, अभिजीत पाटील, नेहा पवार या कलावंतांचा यात सहभाग होता. सुयोग गुरव, ऐश्वर्या परदेशी, वरुण नेवे यांनी या अभिवाचनातील अभंग सादर केले. मनीष गुरव व बुध्दभूषण मोरे यांनी वाद्यावर साथ दिली. उद्या १८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता कवी अरुण कोल्हाटकरांच्या कवितेवर आधारीत भिजकी वही चे सादरीकरण करण्यात येणार आहे.

## बातमी क्र.२

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा जिल्हास्तरीय आविष्कार हा संशोधन महोत्सव उद्या दि. १८ ऑक्टोबर रोजी होत असूनजळगाव जिल्ह्याचा महोत्सव मु.जे.महाविद्यालय, धुळे जिल्ह्याचा शिंदखेडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि नंदुरबार जिल्ह्याचा वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा येथे होणार आहे.

जळगाव जिल्ह्यात ४४६ प्रवेशिकाव्दारे ७४२ विद्यार्थी सहभागी होणार आहेत. धुळे जिल्ह्यात ४७३ प्रवेशिका असून ७९३ विद्यार्थी सहभागी होतील. नंदुरबार जिल्ह्यात २१९ प्रवेशकि असून ३५८ विद्यार्थी सहभागी होणार आहेत अशी माहिती समन्वयक प्रा.एस.आर.कोल्हे, प्रा. जे.व्ही..साळी , प्रा.सुनील कुलकर्णी यांनी दिली. २० ऑक्टोबर रोजी विद्यापीठ प्रशाळांचा संशोधन महोत्सव होईल.

**बातमी क्र.३**

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये आंतरविभागीय कबड्डी आणि व्हॉलीबॉल (पुरुष / महिला) स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, जळगाव विभाग क्रीडा समितीचे सचिव डॉ.श्रीकृष्ण बेलोरकर उपस्थित होते. या स्पर्धेत जळगाव, धुळे, नंदुरबार आणि एरंडोल विभागाच्या एकूण १९२ महिला व पुरुष खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दिनेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.पी.आर.चौधरी यांनी केले.

आजच्या कबड्डी स्पर्धेत : पुरुष गटात नंदुरबार विरुध्द एरंडोल यांच्यात झालेल्या सामन्यात नंदुरबार संघ ४ गुणांनी विजयी झाला. धुळे विरुध्द जळगाव सामन्यात जळगाव विभाग ४० गुणांनी विजयी झाला. नंदुरबार विरुध्द धुळे सामन्यात धुळयाचा संघ १७ गुणांनी विजयी ठरला. महिला गटात धुळे विरुध्द नंदुरबार सामन्यात धुळे २० गुणांनी विजयी झाला. जळगाव विरुध्द एरंडोल सामन्यात जळगाव ६६ गुणांनी विजयी ठरला तर एरंडोल विरुध्द धुळे यात धुळे संघाने १४ गुणांनी विजय मिळवला.

व्हॉलीबॉल स्पर्धेत एरंडोल विरुध्द नंदुरबार सामन्यात २-० ने एरंडोल संघ विजयी झाला.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी